# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्याकलम ४२(६) अंतर्गत)

**अभिवेदन (Representation) क्रमांक १४६ / २०२२**

**अतिरीक्त पूरवणी वीज देयक रद्द करून मिळण्याबाबत**

ज्ञानोबा नामदेव पवार ......... ......................................................................................... अपिलार्थी

विरूध्द

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, सासवड (महावितरण) ....... ............................ .......... .... प्रतिवादी

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :- ज्ञानोबा नामदेव पवार
चिंतामणी गिरमकर, ग्राहक प्रतिनिधी

प्रतिवादीतर्फे :- अरविंद वनमोरे, कार्यकारी अभियंता, सासवड
उमेश सासणे, उपकार्यकारी अभियंता, सासवड

कोरम :- वन्दना कृष्णा (भा.प्र.से. निवृत्त)

सुनावणी तारीख :- १८ ऑक्टोंबर २०२२

आदेश पारित दिनांक :- ४ नोव्हेंबर २०२२

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०20 (ग्राहक गाऱ्हाणे विनियम २०२०) मधील विनियम १९.१ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, महावितरण, बारामती परिमंडळ, (मंच) यांच्या दिनांक २७ एप्रिल २०२२ च्या आदेशाविरूध्द उपरोक्त अपिलार्थीने सदरचे अभिवेदन दिनांक १५ जुलै २०२२ रोजी दाखल केले.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

२. मंचाने तक्रारदार यांच गाऱ्हाणे (क्रमांक १७/२०२१), दिनांक २७ एप्रिल २०२२ रोजीच्या आदेशान्वये नामंजूर केले.

३. अपिलार्थीने त्यांच्या निवेदनातोल व दिनांक १८ ऑक्टोंबर २०२२ रोजीच्या ऑडीओ कॉन्फरसिगद्वारे झालेल्या सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाण आहेत.

- अपिलार्थी ज्ञानोबा नामदेव पवार हे सर्व्हे नंबर ६०९/१, तालुका पुरंदर, जिल्हा पुणे, सासवड येथे दिनांक ३ सप्टेबर २०१८ पासून महावितरणचे व्यावसायिक ग्राहक (क्रमांक १८७२७१८६८२५४) आहेत. अपिलार्थी यांचा सदर जागेत हॉटेल व्यवसाय असून तो व्यवसाय चालविण्यासाठी भाडेतत्वावर देत असतात. व्यवसाय चालू केल्यापासून ते महावितरणच्या वीज देयकांचा भरणा नियमितपणे करत आलेले आहेत.
- जुलै २०१९ नंतर अपिलार्थींना वीज देयके, रिडींग एजन्सीने रिडींग न घेतल्याने सरासरी वीज देयके येऊ लागलो, अपिलार्थींच्या भाडेकरून स्थानिक वायरमन यांच्याशी संपर्क करून रिडींग वाचनाप्रमाणे देयके देण्याची विनंती केली, तरीही सरासरी वीज वापराची देयके येतच होती व त्याचा भरणा नियमितपणे ते करत होते.
- २७ जानेवारी २०20 रोजी महावितरणचे भरारी पथक, बारामती यांनी अपिलार्थीच्या हॉटेल व्यवसायाच्या जागी स्थळ तपासणी केली असता त्यांना तेथे विद्युत अधिनियम २००३, कलम १२६ नुसार कोणताही अनुचित प्रकार आढळला नसल्याचा अहवाल तयार करून त्यावर भाडेकरूंची सही घेऊन निघून गेले. अपिलार्थीने नमुद केले की, सदर तपासणी अहवालाची कोणतीही प्रत भाडेकरूना वा अपिलार्थीस दिली नाही. संग्रहित युनीटबाबत अपिलार्थीस अंधारात ठेऊन त्यांची सही घेण्यात आली.
- मार्च २०20 रोजी नंतर कोव्हीड-१९ च्या लॉकडाऊनमुळे अपिलार्थीचा व्यवसाय पुणतः बंद होता. त्यानंतर ऑगष्ट २०20 रोजी भाडेकरूना जागा सोडायची असल्याने अपिलार्थी हे महावितरणच्या सासवड विभाग कार्यालयात जाऊन रु.१५९५०/- वीज देयक आणले. त्यावेळीही तपासणी अहवालाची प्रत अपिलार्थींना दिली नाही. नोव्हेंबर २०20 मध्ये हॉटेल व्यवसाय नवीन भाडेकरूंना देतेवेळीला जागेवर असलेल्या मीटरचा (क्र.०८२१५०११५५६) डिस्प्ले दिसत नसल्याचे निदर्शनास आले. सदर प्रकाराची माहिती सासवड विभागा कार्यालियास दिली. त्यांनी वायरमन श्री. उमाप यांच्याशी संपर्क करायला

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

सांगितल. वायरमन उमाप व सहाय्यक अभियंता यांनी हॉटेलच्या जागी भेट देऊन नवीन मीटर (क्र.०७६४२९२४१५०) बसवुन दिला.

- प्रतिवादी यांनी माहे २०२१ मध्ये अचानक सासवड कार्यालयातन हाताने लिहीलेले रु.१७६९३०/- चे प्रोविजनल वीज देयक दिले त्यावर "भरारी पथक कारवाई संग्रहित वापर १४२१६ युनिटस जानेवारी २०२०" असा शेरा लिहिलेला होता. सोबत भरारी पथकाचे स्मरणपत्र १ AEE/BMT/FS/OTHERS/05, 19/08/2020 हे जोडुन दिले.
- अपिलार्थीच्या व्यावसायिक जागेची तपासणी झाल्यानतर "स्थळ तपासणी अहवाल" तब्बल एका वर्षानंतर दिला. सदर अहवालाबाबत यापुर्वी तीन वेळा पाठपुरावा करूनही तो मिळाला नाही. भरारी पथक बारामती यांनी सासवड विभागास कोविड १९ च्या काळात ऑगष्ट 2020 मध्ये स्मरणपत्र पाठवूनही सासवड विभागाने तब्बल पाच महिन्यानंतर म्हणजे जानेवारी २०२१ मध्ये सदर पत्राचा संदर्भ देऊन प्रोवीजनल वीज देयक देऊन ते तातडीने भरावयाचा तगादा लावला. सदर प्रकाराची चौकशी करण्याकरीता वरील पत्रकामधील संदर्भ पत्रे जसे "स्थळ तपासणी अहवाल", आकारलेल्या वीज देयकाचा हिशोब याबाबतचे खुलासा दिनांक १ फेब्रुवारी २०२१ च्या पत्रान्वये मागितले परंतू त्यावर कोणतेही उत्तर आले नाही.
- दिनांक २७ मार्च २०२१ रोजी महावितरण कार्यालयास दोन अर्ज दिले त्यावर कोणतेही उत्तर महावितरणे दिले नाही. महावितरण कार्यालयास स्वतः भेट घेऊन वीज रिडींग विषयी विचारणा केली असता रिडींग एजन्सीने रिडींग न केल्यामुळे रिडींग संग्रहित झाल्याचे समजले. वीज कायदा २००३ नुसार ग्राहकाचे वीज रिडींग नियमितपणे करणे व मीटर वाचनाप्रमाणे वीज देयके देणे ही महावितरणची जबाबदारी आहे. ती त्यांनी पार पाडली नाही.
- अपिलार्थीने दिनांक १५ सप्टेंबर २०२१ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे (कक्ष) तक्रार दाखल केली. कक्षाकडे तक्रार दाखल करूनही दिनांक १६ सप्टेंबर २०२१ रोजी अपिलार्थीस कोणतीही पुर्वसूचना न देता व्यवसायाच्या जागेचा वीज पुरवठा खंडीत केला. त्यानंतर, श्री. वनमोरे साहेब व श्री. सासणे साहेब यांच्याची चर्चा केल्यानंतर तो पूर्ववत करण्यात आला. सदर कारवाई ही वीज कायदा २००३ चे कलम १२६ व १३५ तसेच व्यापारी परिपत्रक गाईड बुक १११११९ नुसार झाली नसल्याचे निदर्शनास आणून दिले.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

- अपिलार्थीने दिनांक ७ डिसेंबर २०२१ रोजी मंचाकडे तक्रार दाखल केली. मंचाने दिनांक २७ एप्रिल २०२२ रोजीच्या आदेशान्वये ती नामंजूर केली. अपिलार्थीने दिनांक २४ जून २०२२ रोजी मंचाकडे दिनांक २७ एप्रिल २०२२ रोजीच्या आदेशाविरुध्द पुनर्विलोकन अर्ज सादर केला. मंचाने दिनांक ६ जुलै २०२२ रोजीच्या पत्रान्वये पुनर्विलोकन अर्ज आदेशाच्या दिवसापासून ३० दिवसात सादर केला नाही, म्हणून फेटाळून लावला. वस्तूतः सदर मीटर सदोष होता. प्रतिवादींनी फॉल्टी स्टेटस प्रमाणे जुलै २०१९ पासून वीज देयके दिली आहेत. सदोष मीटरवर संचयीत मीटर रिडींग येण्याचे काहीही कारण नाही. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता, वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके आणि पॉवर क्वालिटी) विनियम २००५ मधील विनियम १५.४.१ प्रमाणे वीज देयक देणे, प्रतिवादीस बंधनकारक आहे. परंतू प्रतिवादीने १५.४.१ या विनियमाचे उल्लंघन केले आहे.
- अपिलार्थीने दिनांक १५ जुलै २०२२ रोजी विद्युत लोकपाल (मुंबई) यांच्याकडे अभिवेदन दाखल केले. अभिवेदनात खालील प्रमाणे मागण्या केल्या.
    - ✓ मंचाचा आदेश विनियम १५.४.१ नुसार नसल्याने तो रद्द करण्यात यावा.
    - ✓ प्रतिवादीने पाठविलेले रु.१७६९३०/- चे वीज देयक रद्द करण्यात यावे व मीटर सदोष असल्यामुळे विनियम १५.४.१ नुसार तीन महिन्याचे सुधारणी पुरवणी वीज देयक देण्यात यावे.
    - ✓ महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरू करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम २०२१ (कृती मानके, विनियम २०२१) नुसार नुकसान भरपाई मिळावी.

४. प्रतिवादी महावितरणने अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ६ ऑक्टोबर २०२२ च्या उत्तरात नमुद केलेले व दिनांक १८ ऑक्टोबर २०२२ रोजीच्या ऑडीओ कॉन्फरसिंगद्वारे सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाण आहेतः

- अपिलार्थी हे महावितरणचे व्यावसायिक ग्राहक (क्रमांक १८७२७१८६८२५४) आहेत. अपिलार्थीचे राष्ट्रीय महामार्गावर सर्व्हे नंबर ६०९/१, तालुका पुरंदर, जिल्हा पुणे, सासवड येथे 'वृंदावन' या नावाचे गार्डन रेस्टॉरंट असून अंदाजे ८० ते १०० ग्राहक बसतील एवढी आसन क्षमता आहे. 'वृंदावन' रेस्टॉरंट हे त्या भागातील नामांकित गार्डन रेस्टॉरंट आहे.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

➢ दिनांक २७ जानेवारी 2020 रोजी भरारी पथक बारामती यांनी अपिलार्थी यांच्या व्यावसायिक जागेची पाहणी केली. पाहणी करताना अपिलार्थी हे सदर ठिकाणी 'वृंदावन' या नावाने हॉटेल चालवीत असल्याचे दिसून आले. भरारी पथकानी वृंदावन हॉटेलचा मीटर तपासला असता त्यावर खालील गोष्टी आढळून आल्या.

ग्राहक क्र.१८७२७१८६८२५४

मीटर क्र.०८२-०१५०११५५६ (पालमोहन कंपनी)

मीटरवरील दि.२७/०१/2020 चे रिडींग - १७०१२ केडब्लूएच

संचयित वीज वापर १४२१६ (१७०१२ - २७९६) युनीटस

शेरा – मीटर सूस्थितीत चालत असल्याचे निदर्शनास आले.

➢ अपिलार्थीच्या सीपीएल चा आढावा घेतला असता असे दिसते की, सदरहू मीटर सप्टेबंर २०१८ मध्ये बसविल्याचे निदर्शनात येते. अपिलार्थीस नॉमल स्टेटसमध्ये सुध्दा कमी वीज वापराची देयके देण्यात आल्याचे दिसते. जुलै २०१९ पासून ते जानेवारी 2020 पर्यत ग्राहकास २०४ युनिटस फॉल्टी स्टेटसची सरासरी आकारणीची चुकीची वीज देयके देण्यात आल्याचे दिसते. मीटरवर १७०१२ केडब्लूएच इतके रिडींग होते व अपिलार्थीस संचयित १४२१६ युनिटस वापराचे वीज देयके देणे गरजेचे होते. सदर स्थळ तपासणी पथक बारामती येथे गेले असता कोणतेही अनधिकृत वापर नसल्याचे दिसून आले. वरील संचयित १४२१६ युनिटसच भरारी पथकास निदर्शनास आल्याचे 'स्थळ तपासणी अहवालात' त्याबाबतची सविस्तर नोंद केलो. तसे संचयित युनिटस बाबत ग्राहकास व त्यांच्या प्रतिनिधीस कळविण्यात आले. सदर अहवालावर भाडेकरूची व मालकाच्या वतीने सुखदेव पवार यांची सही आहे, तसेच, स्थळ तपासणीच्या वेळी घेण्यात आलेल्या फोटोमध्ये सुखदेव पवार हे पंचनामा पाहताना दिसत आहत. संचयित युनिटसचे वीज देयक सुमारे रू.१.८० लाख ते २.० लाखाचे ग्राहकास येईल याची कल्पना ग्राहकास दिली होती. या झालेल्या चुकीबाबत संबधितांची प्रतिवादी योग्य ती कार्यवाही करणार आहेत. अपिलार्थीचा वीज वापर अंदाजे १००० ते १२०० युनिट प्रतीमहा होता व आहे.

➢ महावितरण कार्यालयात ग्राहकांच्या सोयीसाठी वीज देयके न मिळाल्यास ते देण्यासाठी एक खिडकी योजना उपलब्ध करून दिलेली आहे. एक खिडकी योजनेतील कर्मचाऱ्यांना संचयित वीज वापराबाबतची कोणतीही कल्पना नसल्याने अपिलार्थीने ऑगष्ट 2020 मध्ये महावितरणच्या कार्यालयातून काढून

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

घेतलेला वीज देयक बरोबर आहे की, नाही याची शहानिशा न करता भरले असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

- नोव्हेंबर २०२० मध्ये जुन्या मीटरचा डिस्प्ले फॉल्टी झाल्या कारणास्तव ग्राहकास त्यावर नवीन मीटर बसून देण्यात आला, जेणे करून पुढे येणारा नवीन भाडेकरू नवीन मीटर प्रमाणे वीज देयके अदा करोल व मागील कोणतीही थकबाकी राहणार नाही. तसेच, त्यादरम्यान लॉकडाऊनचा काळ असल्याने माहे मार्च २०२० ते नोव्हेंबर २०२० या कालावधीत शुन्य युनीटसची वीज देयके देण्यात आली.
- अपिलार्थीस वेळोवेळी वीज देयके देण्याकरीता महावितरणचे कर्मचारी गेले असता कोविड महामारीमुळे हॉटेल बंद असल्याकारणाने ग्राहकास संचयित वीज देयक देण्यास विलंब झाला. अपिलार्थीस वेळोवेळी वीज देयक समजून सांगून त्याचा भरणा करण्याबाबत विनंती करण्यात आली, परंतू अपिलार्थीने कोणतेही वीज देयक भरले नाही व अपिलार्थीने दिनांक ७ डिसेंबर २०२१ रोजी मंचाकडे तक्रार दाखल केली. मंचाने दिनांक २७ एप्रिल २०२२ रोजीच्या आदेशान्वये ती नामंजूर केली.
- महावितरणतर्फे वापरलेल्या वीज युनिटसच्या वीज देयकाची भरणा करण्याची विनंती अपिलार्थीस करण्यात आली. तसेच अपिलार्थीस वेळोवेळी वीज देयकाचा हफ्ता करून त्याचा भरणा करण्याबाबत विनंती करण्यात आली. वरील सर्व बाबी पाहता महावितरणची भुमिका नेहमीच सहकार्याची असल्याची लक्षात यइल, त्यामुळे अपिलार्थीचे अभिवेदन फेटाळण्यात यावे.

**<u>विश्लेषण व निर्णय</u>**

५. दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकण्यात आले व उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले.

६. अपिलार्थी हे महावितरणचे व्यावसायिक ग्राहक आहेत. त्यांचे सासवड येथे 'वृंदावन' या नावाचे अंदाजे ८० ते १०० ग्राहक बसतील एवढी आसन क्षमता असलेले गार्डन रेस्टॉरंट आहे. दिनांक २७ जानेवारी २०२० रोजी प्रतिवादींचे भरारी पथक, बारामती यांनी अपिलार्थी यांच्या व्यावसायिक जागेची पाहणी केली. तपासणीमध्ये गार्डन रेस्टॉरंटच्या मीटरवर संचयित वीज वापर १४२१६ (१७०१२ - २७९६) युनीटसचे बिलींग करण्याचे राहून गेल्याचे दिसते असे निदर्शनात आले. अपिलार्थीचा सदरहू मीटर सीपीएलनूसार ऑक्टोबर

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

२०१८ पासून कार्यान्वीत होता त्यावेळी मीटरवर १ युनीट इतके रिडींग होते. तथापि ऑक्टोबर २०१८ ते जून २०१९ या कालावधीत २७९५ युनीटसचे वापर झाल्याचे दिसते, म्हणजे फक्त सरासरी ३११ युनीटसचेच बिलींग झाल्याचे दिसते. जुलै २०१९ पासून ते जानेवारी २०२० पर्यत ग्राहकास २०४ युनिटस फॉल्टी स्टेटसची सरासरी चुकीची वीज देयके आकारण्यात येत असल्याचे दिसते. यावरून असे निदर्शनास येते की सदरहू मीटर योग्य रित्या कार्यरत होते. महावितरणने दिलेले रू.१७६९३०/- चे वीज देयक योग्य आहे हे निदर्शनास येते.

७. अपिलार्थीने नमुद केले की सदरहू मीटर सदोष आहे व विनियम १५.४.१ नुसार तीन महिन्याचे सुधारणी पुरवणी वीज देयक देण्यात याव अशी मागणी केली. भरारी पथकाने २७ जानेवारी २०२० रोजी मीटरची तपासणी केली होती त्यावेळी मीटर चालू स्थितीत आठळला, तपासणी अहवालावर अपिलार्थीची स्वाक्षरी आहे. त्यानंतरच्या काही काळानंतर मीटरचा डिस्प्ले गेल्यानंतर पुढील रिडींग उपलब्ध झाली नाही. म्हणून अपिलार्थीने केलेल्या सदोष मीटर मागणीत काही तथ्य आठळत नाहो.

८. मंचाने दिनांक २७ एप्रिल २०२२ रोजीच्या आदेशात या बाबींचा विचार केला असल्याने सर्वसाधारण मंचाचे आदेश योग्य आहेत. तथापि, या सर्व बाबींचा एकत्रित उहापोह कला असता वरील विवेचनावरून मी खालील प्रमाणे आदेश पारीत करोत आहे.

- ✓ पुरवणी वीज देयकावर लागलेले व्याज व वीज विलंब आकारणी पुरवणी वीज देयक दिल्यापासून ते आदेशाच्या तारखेपर्यत माफ करण्यात येत आहे.
- ✓ अपिलार्थींना पुरवणी वीज देयक महिन्याचे चालू वीज देयक विचारात घेऊन समान दहा हफ्त्यात भरण्याची परवानगी देण्यात येत आहे. दिलेल्या हफ्त्यावर व्याज व विलंब आकार लागणार नाही. तथापि अपिलार्थीने प्रतिमहा दिलेले हफ्ते वेळेत न भरल्यास त्यावर नियमानूसार व्याज व विलंब आकार लागू होईल, व प्रतिवादी त्यांच्यावर नियमानूसार कारवाई करू शकतात.
- ✓ अपिलार्थींच्या इतर मागण्या नामंजूर करण्यात येत आहत.
- ✓ आदेशाच्या दिनांकापासून दोन महिन्यात अनुपालन अहवाल या कार्यालयात सादर करण्यात यावा.

९. अपिलार्थीचे अभिवेदन निकाली काढण्यात येत आहे.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

१०.   विद्युत लोकपाल (मुंबई) कार्यालयातील सचिव यांनो वरील आदेशाची प्रत अधिक्षक अभियंता, बारामती यांना पाठवावी व प्रतिवादीच्या मीटर वाचनातील अनियमीततताबाबत योग्य त्या कारवाई करण्यात यावी असे आदेशीत करण्यात यत आहे.

सही/-
(वन्दना कृष्णा)
विद्युत लोकपाल (मुंबई)

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai
M.E.R.C.